पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी –१८, अग्निशामक विभाग
क्र. अग्नि /४/कावि/२८२/२०२२
दिनांक - ३१ /५/२०२२

प्रती,
१) मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, माहिती व तंत्रज्ञान विभाग
२) सहा. आयुक्त, माहिती व जनसंपर्क विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी -१८

विषय – पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील तमाम नागरीकांना व सर्व प्रकारच्या इमारत अग्निशमन व जिवित सुरक्षितता बाबत जाहिर प्रकटन करणे बाबत.
संदर्भ – मा. आयुक्त तथा प्रशासक यांचा दि. २७/५/२०२२ चा मान्य प्रस्ताव

२/-

पिंपरी चिंचवड क्षेत्रांमध्ये निवासी, मिश्र व बिगर निवासी उत्तुंग इमारती मोठ्या प्रमाणात आहेत. " महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६" हा कायदा संपूर्ण महाराष्ट्रामध्ये लागू असून, अधिनियमातील कलम ३(१) प्रमाणे कोणत्याही इमारतीमध्ये किंवा तिच्या भागामध्ये आवश्यक असणा-या आग प्रतिबंधक उपयायोजना करणे, त्या कार्यान्वित ठेवणे, तसेच कलम ३(३) नुसार, लायसन्स प्राप्त एजन्सीकडील विहित नमुन्यातील प्रमाणपत्र मनपा अग्निशामक कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक आहे. व याची संपूर्ण जबाबदारी ही त्या इमारतीचा मालक किंवा तिचा वापर करणारा भोगवटादार यांची आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, कार्यक्षेत्रामध्ये अशा प्रकारची दुर्घटना घडुनये याकरीता पिंपरी चिंचवड महानगरपालिका, क्षेत्रातील सर्व प्रकारच्या इमारती, उंच निवासी, गृहनिर्माण संस्था व्यावसायिक, मिश्र इमारती यांचे भोगवटादार यांना जिवित अग्निसुरक्षिततेच्या अनुषंगाने इमारतीमध्ये करावयाचे उपाययोजना बाबत दैनिक प्रमुख वर्तमानपत्र, मनपा वेबपोर्टल, मनपा फेसबुक पेज, सोशल मेडीया सेल इत्यादी मार्फत नागरिकांना जाहिर आवाहन सोबत जोडणेत आले असून, सदरचे जाहीर आवाहन प्रसार माध्यमाव्दारे प्रसिध्द करणेत यावे.

अतिरिक्त आयुक्त (१)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -१८

प्रत –
मा. आयुक्त तथा प्रशासक
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी -१८
.......... यांना माहिती करीता.

## पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी -१८
### अग्निशामक विभाग
## इमारत अग्निशमन व जिवित सुरक्षितता जनहितार्थ जाहीर प्रकटन

पिंपरी चिंचवड क्षेत्रांमध्ये निवासी, मिश्र व बिगर निवासी उत्तुंग इमारती मोठ्या प्रमाणात आहेत. " महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६" हा कायदा संपूर्ण महाराष्ट्रामध्ये लागू असून, अधिनियमातील कलम ३(१) प्रमाणे कोणत्याही इमारतीमध्ये किंवा तिच्या भागामध्ये आवश्यक असणा-या आग प्रतिबंधक उपयायोजना करणे, त्या कार्यान्वित ठेवणे, तसेच कलम ३(३) नुसार, लायसन्स प्राप्त एजन्सीकडील विहित नमुन्यातील प्रमाणपत्र मनपा अग्निशामक कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक आहे. व याची संपूर्ण जबाबदारी ही त्या इमारतीचा मालक किंवा तिचा वापर करणारा भोगवटादार यांची आहे.

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, क्षेत्रातील सर्व प्रकारच्या इमारती, उंच निवासी, गृहनिर्माण संस्था व्यावसायिक, मिश्र इमारती यांचे भोगवटादार यांना जिवित अग्निसुरक्षिततेच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, इमारतीमधील एका किंवा एका पेक्षा अधिक जिने (स्टेअरकेस) आहेत किंवा रेफ्युज एरीया आहे किंवा मार्गीका, (लॉबी / पॅसेज) अशा इमारतींमधील सदर जिने रेफ्युज एरीया, लॉबी/ पॅसेज हे विनाअडथळा मोकळे ठेवणे आवश्यक आहे. सदर जीन्यांमध्ये (स्टेअरकेसमध्ये), रेफ्युज एरीया, लॉबी/ पॅसेजमध्ये कोणत्याही प्रकारचे ज्वलनीशील पदार्थ, टाकाऊ साहित्य इत्यादीची साठवणुक करणेत येऊ नये. सदर परिसर हा आग व अन्य दुर्घटनासमयी आपत्कालीन वापराकरीता पुर्णपणे सुस्थितीत व मोकळा ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. इमारतीमध्ये आग दुर्घटना घडू नये अथवा त्यामध्ये जिविज हानी वित्तहानी होऊ नये ह्याकरीता उक्त दक्षता घेणे अत्यंत आवश्यक आहे.**

नागरीकांनी आपले जीवित व वित्तहानी रोखण्यासाठी योग्य ती खबरदारी घेऊन उक्त कार्यवाही करावी. पिंपरी चिंचवड महानगरपालिका, अग्निशमन सेवा आग व अन्य दुर्घटनेकरीता तत्पर व सुसज्ज आहे. तथापि, जिवित व वित्तहानी वाचविणेकामी उक्तनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका, अग्निशामक विभागास सहकार्य करावे. असे आवाहन करणेत येत आहे. आपत्कालीन समयी खालील क्रमांकावर संपर्क साधणेत यावा.

| | | ☎ | मोबाईल | WhatsApp |
|---|---|---|---|---|
| १) मुख्य अग्निशमन केंद्र, पिंपरी | - | 27423333 | 9922501475 | 7030908991 |
| २) उप अग्निशमन केंद्र, भोसरी | - | 8669692101 | 9922501476 | 7030908992 |
| ३) उप अग्निशमन केंद्र, प्राधिकरण | - | 27652066 | 9922501477 | 7030908993 |
| ४) उप अग्निशमन केंद्र, रहाटणी | - | 8669693101 | 9922501478 | 7030908994 |
| ५) उप अग्निशमन केंद्र, तळवडे | - | 27690101 | 9552523101 | 7030908996 |
| ६) उप अग्निशमन केंद्र, चिखली | - | 27494849 | 8669694101 | 7030908995 |
| ७) उप अग्निशमन केंद्र, थेरगांव | - | | 7768090101 | 7090907999 |

मुख्य अग्निशमन अधिकारी
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -१८

आयुक्त तथा प्रशासक
पिंपरी चिंचवड महानगरपलिका
पिंपरी -१८